पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग कार्यालय

**कार्यपत्रिका क्र. ४**

**सभावृत्तांत**

दिनांक : १२/०३/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे मार्च २०१४ ची मासिक सभा मंगळवार दिनांक १२/०३/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१. मा.जावेद रमजान शेख -- सभापती
२. मा. जगदिश शेट्टी
३. मा.श्री. उल्हास शेट्टी
४. मा.भारती फरांदे
५. मा.आर.एस.कुमार
६. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
७. मा.नेटके सुमन राजेंद्र
८. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
९. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१०. मा.सौ.काळभोर वैशाली जालिंदर
११. मा.सौ. साळुंके सविता सुरेश

याशिवाय मा.श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी, मा.श्री. गोपाळ चिंचवडे – कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.श्री. लियाकत पिरजादे – कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.संजय भोसले - उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.मोहन करमरकर, मा.श्रीम.मोमीन- उपअभियंता (पाणीपुरवठा) मा.श्री. ए.ए.कुलकर्णी– कनिष्ठ अभियंता (जलनि:सारण), मा.श्री.विजयकुमार कुरुप - कनिष्ठ अभियंता (विद्युत), इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

मानगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत ,सभापती यांनी उपस्थित सन्माननिय नगरसदस्य. .करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली

अ) दिनांक १२/०२/२०१४ रोजी तहकुब करणेत आलेल्या व दिनांक १८/०२/२०१४ रोजी घेणेत आलेल्या माहे फेब्रुवारी चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक २) कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १८/०२/ २०१४ रोजी घेणेत आलेल्या अंदाजपत्रक विषयीचे विशेष सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक ३) कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

खालीलप्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

| | |
|---|---|
| विषय क्र. १ | मा. लेखाधिकारी अ क्षेत्रीय कार्यालय यांचे पत्र<br>तरतुद वर्ग करणेबाबत |
| विषय क्र.२ | कार्यकारी अभियंता, विद्युत यांचे पत्र दिनांक ११/३/२०१४<br>तरतुद वर्ग करणेबाबत. |
| विषय क्र.३ | कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांचे पत्र दिनांक ११/३/२०१४<br>तरतुद वर्ग करणेबाबत. |
| विषय क्र.४ | मा.मोरेश्वर महादू भोंडवे यांचा प्रस्ताव<br>आकुर्डी येथील अंडरपासचे नामकरण करणेबाबत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १४ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : १२/०३/२०१४ | विभाग | : लेखा |
| सुचक | : मा. वैशाली काळभोर | अनुमोदक | : मा. भारती फरांदे |

संदर्भ: लेखाधिकारी अ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्रमांक अक्षेका/लेखा/७अ /कावि/ ९ /२०१४ दिनांक १२/०३/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभाग अधिकारी व प्रशासन अधिकारी यांचे वाहनाकरीता लागणाऱ्या इंधनाची बीले स्थायी अग्रीमधन मधून वाहन इंधन या लेखाशिर्षावव खर्ची टाकणेत येतात. सदर लेखाशिर्षावर सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात सुधारित र.रु.२,४०,०००/- तरतूद करणेत आलेली असून पुढील बीले खर्ची टाकणेस सदरची तरतूद कमी पडणार आहे. त्याकरीता प्रशासन विभागाकडील "प्रभाग समिती प्रवास खर्च" या लेखा शिर्षावरुन "वाहन इंधन" या लेखाशिर्षावर र.रु.१,६०,०००/- व "रजा प्रवास भत्ता" या लेखाशिर्षावर र.रु.३०,०००/- इतकी तरतूद वर्ग करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०३ अनुसुची प्रकरण ७(२) नुसार

मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १५ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : १२/०३/२०१४ | विभाग | : लेखा/ विद्युत |
| सुचक | : मा. जगदिश शेट्टी | अनुमोदक | : मा. आर. एस. कुमार |

संदर्भ: कार्यकारी अभियंता, विद्युत यांचेकडील पत्र क्रमांक
अक्षेका/विद्युत /कावि/ ३२८ /२०१४ दिनांक ११/०३/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाचे विद्युत विभागाकडील अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर सुधारीत तरतुद र.रु.३५,०००/- व हायड्रोलिक गाडी भाडे तत्वावर पुरविणे या लेखाशिर्षावर र.रु. ३२,००,०००/- इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि, मार्च २०१४ अखेर होणारा खर्च विचारात घेता अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. ५,०००/- व हायड्रोलिक गाडी भाडे तत्वावर पुरविणे या लेखाशिर्षावर र.रु. ५,००,०००/- इतकी तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. "अ" क्षेत्रीय कार्यालयाचे विद्युत विभागाकडील ध्वनीक्षेपण व्यवस्था या लेखाशिर्षावर र.रु. १५,००,०००/- इतकी तरतुद करणेत आलेली असून त्यापैकी र.रु.११,३६,८४६/- इतकी शिल्लक आहे. त्यामुळे ध्वनीक्षेपण व्यवस्था या लेखाशिर्षावरुन र.रु. ५,०००/- अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर व र.रु. ५,००,०००/- हायड्रोलिक गाडी भाडे तत्वावर पुरविणे या लेखाशिर्षावर वर्ग करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०३ अनुसुची प्रकरण ७(२) मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १६ | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : १२/०३/२०१४ | विभाग | : लेखा/ पाणीपुरवठा |
| सुचक | : मा. सुमन नेटके | अनुमोदक | : मा. संगिता भोंडवे |

संदर्भ: कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांचेकडील पत्र क्रमांक
अप्र/पापु/ ९ /कावि/ ४६४ /२०१४ दिनांक ११/०३/२०१४

अ क्षेत्रीय कार्यालयाचे पाणीपुरवठा विभागाचे अंदाजपत्रकात सन २०१३-१४ करीता रजा प्रवास भत्ता या लेखाशिर्षावर र.रु. ८४,०००/- इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. सन २०१२-१४ या ब्लॉकसाठी ७० कर्मचाऱ्यांनी रजा प्रवास भत्ता घेतलेला आहे. उर्वरीत ८ कर्मचा-यांना रजा प्रवास भत्ता अदा करणे

आवश्यक असून याकामी तरतुद शिल्लक नाही.  अ क्षेत्रीय कार्यालयाचे पाणीपुरवठा विभागाकडील "स्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर र.रु. २१,३२,९९७/- इतकी इतकी शिल्लक आहे.  त्यामुळे "स्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावरुन र.रु. ५०,०००/-  "रजा प्रवास भत्ता" या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १७ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : १२/०३/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा.  उल्हास शेट्टी | अनुमोदक | : मा.  प्रतिभा भालेराव |

संदर्भ:   मा.मोरेश्वर भोंडवे यांचा प्रस्ताव

आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ नव्याने बांधणेत आलेल्या रेल्वे अंडरपासचे "कै.महादेव न.भोंडवे अंडरपास" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही /-
(श्री.जावेद शेख)
सभापती
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग समिती
अप्र/११/ कावि/ ११४/ २०१४
दिनांक   २५ /०३ /२०१४

सही /-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ क्षेत्रीय कार्यालय

प्रत- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.